# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in


**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/१५५४ **दिनांक:** १४/०९/२०२५

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी २०२५ सत्राचे परीक्षा अर्ज.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील परीक्षा अर्ज सुरू करण्यात येत आहेत. सुरवातीस सोमवार दिनांक १५/०९/२०२५, दुपारी १२.०० पासून सोबत जोडलेल्या यादीतील अभ्यासक्रमांचे हिवाळी २०२५ सत्र परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया व वेळापत्रक याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

१. सर्व अभ्यासक्रमांचे विहित शुल्क, विलंबशुल्क आणि अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विहित मुदतीतच संबंधित लिंकद्वारे ऑनलाईन पद्धतीने भरण्याची व कायम करण्याची प्रक्रिया विद्यार्थी व महाविद्यालय/परिसंस्थानी काटेकोरपणे पार पाडावी.

२. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी आणि विषयवार विभागांचे प्रमुख तसेच विषयशिक्षक यांचे प्रमाण लक्षात घेऊन प्रत्येक प्राध्यापकास किमान २५ विद्यार्थी किंवा त्या प्रमाणात नेमून द्यावेत आणि अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज तपासून खात्री करण्याची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विभाग/विभाग प्रमुख व विषय प्राध्यापकावर निश्चित करावी, म्हणजे यामुळे विद्यार्थ्यांने भरलेला व सादर केलेला अर्ज बिनचूकपणे तपासून कायम (Inward) करता येईल. याबाबतचे निर्देश दिनांक ११/०९/२०२५ रोजी प्रकाशित परिपत्रक क्रमांक २३०/२०२५ मध्ये आणि दिनांक १२/०९/२०२५ रोजी आयोजित परीक्षा नियोजन कार्यशाळेच्या बैठकीत देण्यात आले आहेत.

३. यानुसार विद्यार्थ्यांने परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी अथवा ऑनलाईन भरण्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येक महाविद्यालयाने/परिसंस्थेने परीक्षा अधिकारी यांच्या साहाय्यासाठी प्रत्येक विषयाचे विभागप्रमुख, प्रत्येक विषयाचे प्राध्यापक यांच्या मदतीने प्रत्येक वर्गाचे अभ्यासक्रमांच्या पॅटर्ननुसार त्या त्या सत्रातील परीक्षा अर्जात कोणकोणते विषय असावेत, त्याचे अनुक्रमांक आणि त्यासंदर्भातील सर्व माहिती याचे प्रारूप महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकास, प्रत्येक विद्यार्थ्यास आणि परीक्षा प्रक्रियेत सहभागी कार्यालयीन कर्मचाऱ्यास उपलब्ध करावे. यामुळे संबंधित विद्यार्थ्यास आपला परीक्षा अर्ज भरणे आणि २५ विद्यार्थी नेमून दिलेल्या प्राध्यापकास, तो तपासून देणे व परीक्षा प्रक्रियेत सहभागी कार्यालयास, तो कायम करणे नेमकेपणाने शक्य होईल.

४. महाविद्यालय/परिसंस्थेतील प्रत्येक विद्यार्थी लॉगिनद्वारे स्वत:च्या प्रोफाईलमधून परीक्षा अर्ज भरण्याच्या लिंकवर प्रवेशित होईल. प्रोफाईलमधून जी माहिती परीक्षा अर्जावर अवतीर्ण झाली आहे त्याची खातरजमा संबंधित विद्यार्थ्यांने करावी आणि त्यानंतर संबंधित विद्यार्थी स्वत:च्या अभ्यासपत्रिकांची (Courses) खात्री करून परीक्षा अर्ज भरेल. त्यानंतर परीक्षा अर्ज महाविद्यालयाच्या यंत्रणेकडून तपासून घेण्यासाठी संबंधित विद्यार्थी आपला Preview अशी अक्षरे असलेला अर्ज प्रिंट करेल आणि महाविद्यालयातून तपासून घेईल. या प्रक्रियेसाठी संबंधित विद्यार्थ्यास केवळ दोन दिवसांचा कालावधी निर्धारित केला असून तो पाळणे संबंधित विद्यार्थ्यांवर बंधनकारक आहे.

५. विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरलेला अर्ज अथवा प्रिंट काढून सादर केलेला अर्ज महाविद्यालयाच्या डॅशबोर्डवर अंकित होताच महाविद्यालयाने संबंधित अर्ज तात्काळ तपासून तो कायम करणे अनिवार्य आहे. यासाठी प्रत्येकी २५ विद्यार्थ्यांचा ऑनलाईन ग्रुप तयार करण्याची आणि त्यावर नियत्रंण ठेवण्याची जबाबदारी नेमलेल्या प्राध्यापकावर सोपवावी.

६. प्रत्येक विद्यार्थ्याच्या परीक्षा अर्जात नमूद विद्यार्थ्याचे नाव, अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासपत्रिकांची नावे(Courses), अभ्यासपत्रिकांचा कोड, विद्याशाखा, लेखी (Theory), प्रात्यक्षिक Practical, सत्रातंर्गत लेखी परीक्षा (Insem), मौखिक (Oral), सत्रकार्य (Termwork), प्रबंधिका (Dissertation), प्रकल्प (Project), क्षेत्रीय प्रकल्प (Field Project), कामकाजकालीन अनुभवाचे प्रशिक्षण (On Job Training), संशोधन प्रकल्प (Research Project), Tutorial यासह संबंधित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने ज्या बाबी अथवा निर्देश आवश्यक आहेत ते तपासून सदर अर्ज पुढील दोन दिवसाच्या आत तात्काळ कायम (Inward) करणे अनिवार्य आहे.

७. महाविद्यालयाने/परिसंस्थेने परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांस ईमेल अथवा टेक्स्ट मेसेजद्वारा सूचना मिळेल, त्यानंतर विद्यार्थ्याने स्वत:च्या प्रोफाईलमध्ये लॉगिन करुन ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध असलेल्या गेटवेद्वारे खालील रकान्यात नमूद केलेल्या कालावधीत परीक्षाशुल्क भरणे अनिवार्य आहे. अन्यथा संबंधित विद्यार्थ्यास आपोआप विलंब अथवा अतिविलंब शुल्क अदा करावे लागेल.

८. विद्यार्थ्याने ऑनलाईन परीक्षाशुल्क भरल्यानंतर सदर विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज परीक्षाविषयक पुढील प्रक्रियेकरिता कायम होईल आणि त्यानुसार त्याचे परीक्षेसाठीचे ओळखपत्र तयार होईल.

९. विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज अचूक भरावा आणि परीक्षा अर्ज अचूक भरल्याची खातरजमाही संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने करावी. परीक्षा अर्ज कायम झाल्यानंतर परीक्षा ओळखपत्रामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये बदल/सुधारणा करता येणार नसल्यामुळे याची काटेकोरपणे दक्षता संबंधितांनी घ्यावी. परीक्षा अर्ज कायम केल्यानंतर अभ्यासपत्रिका नोंद अथवा काढून टाकण्याची सुविधाही कोणत्याही परिस्थितीत देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. सोबत जोडलेल्या यादीतील अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेचा कालावधी :—

| विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा नियमीत कालावधी | महाविद्यालय/संस्थेने परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्याने विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/संस्थेने विलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्याने अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/संस्थेने विलंब व अतिविलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्याने अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| **१५/९/२०२५ दुपारी १२ पासून ते २०/९/२०२५** | **१५/९/२०२५ ते २३/९/२०२५** | **२१/९/२०२५ ते २२/९/२०२५** | **२३/९/२०२५ ते २५/९/२०२५.** | **२३/९/२०२५ ते २५/९/२०२५ सायं ५ पर्यत** | **२३/९/२०२५ ते २६/९/२०२५ सायं ५ पर्यत** | **२८/९/२०२५ सायं ५ पर्यत** |

महाविद्यालयाने वर दर्शवल्याप्रमाणे कोणत्याही टप्प्यावर परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतर विद्यार्थ्यांनी तात्काळ दोन दिवसामध्येच परीक्षा शुल्क ऑनलाईन स्वरुपात अदा करणे अनिवार्य आहे. अन्यथा संबंधित विद्यार्थ्यास आपोआप त्यापुढील विलंब शुल्क आकारले जाईल. तसेच दिनांक २८/०९/२०२५ नंतर विद्यार्थी विलंबशुल्कासहही शुल्क भरू शकणार नाहीत आणि पर्यायाने संबंधित विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे जमा होणार नाही आणि विद्यार्थ्यास परीक्षेपासून वंचित रहावे लागेल, याची विद्यार्थ्यांनी व संबंधित सर्व घटकांनी नोंद घ्यावी.

तसेच विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज वेळेत भरून महाविद्यालयाकडे ऑनलाईन जमा केल्यावर आणि Preview Print सादर केल्यावर जर संबंधित महाविद्यालयाकडून विद्यार्थ्याचा अर्ज वरील रकान्यातील कालमर्यादेत कायम झाला नाही तर संबंधित विद्यार्थ्यास भराव्या लागणाऱ्या विलंब अथवा अतिविलंब शुल्काचा भार आपोआपच महाविद्यालय/ परिसंस्थेवर पडेल.

सबब, याद्वारे सर्व महाविद्यालये/परिसंस्था, प्राचार्य/संचालक, प्राध्यापक, विभागप्रमुख, महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी, परीक्षा सहायक कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांना आवाहन करण्यात येते की, महाविद्यालय/परिसंस्थेतील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे/पाल्यांचे विहित मुदतीत अचूक परीक्षा अर्ज भरणे, तपासून कायम करणे आणि परीक्षा शुल्कही विहित कालावधीतच ऑनलाईन स्वरूपात भरणे; तसेच कोणताही पात्र विद्यार्थी/पाल्य परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

तसेच विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ मिळणार नाही. कारण अशी मुदतवाढ झाल्यास परीक्षार्थी ओळखपत्र, बारकोड जुळणी आणि परीक्षार्थींच्या अभ्यासविषयांची निश्चिती करताना समस्या निर्माण होतात. परिणामी प्राचार्य/संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, परीक्षा अधिकारी, विद्यार्थी यांनाच स्थानिक पातळीवर रोषास सामोरे जावे लागते; पर्यायाने विद्यापीठ परीक्षा आयोजनावरही आणि त्याअनुषंगाने परीक्षा निकालांवर विपरित परिणाम होतो.

त्याचप्रमाणे विद्यापीठ संकेतस्थळावरून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात आणि हे पत्रक सर्वच संबंधित घटकांच्या माहितीस तात्काळ आणावे.

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

सोबत :
सोमवार दिनांक १५/०९/२०२५, दुपारी १२.०० पासून परीक्षा अर्ज सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमांची यादी.

(टिप : हिवाळी सत्र परीक्षा २०२५ मधील उर्वरित परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया दिनांक १७/०९/२०२५ पासून कार्यान्वीत होईल.)

विशेष सूचना :

१. हिवाळी सत्र २०२५ परीक्षांचे अर्ज कायम करताना संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने परीक्षार्थी विद्यार्थ्यांची ७५टक्के उपस्थिती आणि सत्रपूर्ततेची काळजी घेणे अनिवार्य असून यासंदर्भातील सर्व कागदपत्रे महाविद्यालय स्तरावर जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. यासंदर्भातील सर्व जबाबदारी प्राचार्य/संचालक यांची राहील.
२. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत परीक्षा अर्ज कायम करताना महाविद्यालय स्तरावर यासंदर्भातील सर्व कागदपत्रे जतन करणे आणि परीक्षा नियोजन कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षाकालीन अनुरूप सुविधा उपलब्ध करून देणे, वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

परीक्षा अर्ज भरण्यातील प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी व त्रुटींसाठी ०२०-७१५३३६३३ या दूरध्वनीवर अथवा examsupport@pun.unipune.ac.in या मेलवर त्वरित संपर्क साधावा.

सोमवार दिनांक १५/०९/२०२५, दुपारी १२.०० पासून परीक्षा अर्ज सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमांची यादी.

| Sr.No. | Faculty_Name | Pattern_Name |
|---|---|---|
| 1 | Humanities | BACHELOR OF ARTS 2024 Credit Pattern |
| 2 | Humanities | MA 2023 Credit Pattern |
| 3 | Humanities | MA Marathi 2024 Credit Pattern |
| 4 | Science & Technology | B.Sc. (Biotech) 2024 Credit Pattern |
| 5 | Science & Technology | B.Sc. (Computer Application) 2024 Credit Pattern |
| 6 | Science & Technology | B.Sc. (Computer Science) 2024 Credit Pattern |
| 7 | Science & Technology | B.Sc.(Cyber and Digital Science)2024 Credit Pattern |
| 8 | Science & Technology | B.Sc.(Hospitality Studies) 2024 Credit Pattern |
| 9 | Science & Technology | B.Sc.(REGULAR) 2024 Credit Pattern |
| 10 | Science & Technology | BCA (Science) 2024 Credit Pattern |
| 11 | Science & Technology | BSc(Animation)(REV.2024) |
| 12 | Science & Technology | M.A./M.Sc. GEOGRAPHY Credit Pattern 2023 |
| 13 | Science & Technology | M.A./M.Sc. STATISTICS Credit Pattern 2023 |
| 14 | Science & Technology | M.A./M.Sc. STATISTICS Credit Pattern 2024 |
| 15 | Science & Technology | M.Sc. ANALYTICAL CHEMISTRY Credit Pattern 2023 |
| 16 | Science & Technology | M.Sc. BIO-CHEMISTRY Credit Pattern 2023 |
| 17 | Science & Technology | M.Sc. BIOTECHNOLOGY Credit Pattern 2023 |
| 18 | Science & Technology | M.Sc. BOTANY Credit Pattern 2023 |
| 19 | Science & Technology | M.Sc. Computer Applications Credit Pattern 2023 |
| 20 | Science & Technology | M.Sc. Computer Science Credit Pattern 2023 |
| 21 | Science & Technology | M.Sc. DRUG CHEMISTRY Credit Pattern 2023 |
| 22 | Science & Technology | M.Sc. ELECTRONICS Credit Pattern 2023 |
| 23 | Science & Technology | M.Sc. ENVIRONMENTAL SCIENCE Credit Pattern 2023 |
| 24 | Science & Technology | M.Sc. INORGANIC CHEMISTRY Credit Pattern 2023 |
| 25 | Science & Technology | M.Sc. MATHEMATICS Credit Pattern 2023 |
| 26 | Science & Technology | M.Sc. MICROBIOLOGY Credit Pattern 2023 |
| 27 | Science & Technology | M.Sc. ORGANIC CHEMISTRY Credit Pattern 2023 |
| 28 | Science & Technology | M.Sc. PHYSICAL CHEMISTRY Credit Pattern 2023 |
| 29 | Science & Technology | M.Sc. PHYSICS Credit Pattern 2023 |
| 30 | Science & Technology | M.Sc. ZOOLOGY Credit Pattern 2023 |
| 31 | Science & Technology | M.Sc. ZOOLOGY Credit Pattern 2024 |
| 32 | Science & Technology | M.Sc.Tech/M.Tech Credit Pattern 2023 |
| 33 | Commerce & Management | B.B.A. 2024 Credit Pattern |
| 34 | Commerce & Management | B.B.A.( International Business ) 2024 Credit Pattern |
| 35 | Commerce & Management | B.B.A.(Computer Application) 2024 Credit Pattern |
| 36 | Commerce & Management | B.Com(Business Management) 2024 Credit Pattern |
| 37 | Commerce & Management | B.Com(Computer Application) 2024 Credit Pattern |
| 38 | Commerce & Management | B.Com(International Business) 2024 Credit Pattern |
| 39 | Commerce & Management | BACHELOR OF COMMERCE 2024 Credit Pattern |
| 40 | Commerce & Management | BCA (Commerce) 2024 Credit Pattern |
| 41 | Commerce & Management | MCOM 2023 Credit pattern |

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ